दैनिक पुढारी दि. ४.५.०७



डॉ. डी. वाय. पाटील कला, क्रीडा, शैक्षणिक व सांस्कृतिक ट्रस्टतर्फे १० वी परीक्षेत गुणवत्ता यादीत आलेल्या कु. मृदुला बेंडगिरी या विद्यार्थिनीचा पारितोषिक देऊन गौरव करताना शिक्षणमहर्षि डॉ. व्ही. टी. पाटील, छायाचित्रात डावीकडून संजय डी. पाटील, एम. बी. लोहिया, डॉ. डी. वाय. पाटील, प्रा. गुरुनाथ मुंगळे, डी. एम. शेटके आदी. छाया : शशिकांत उरूणकर.

# महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापण्याचे प्रयत्न केले जातील

## -डॉ. डी. वाय. पाटील

**कोल्हापूर, दि. ३ (प्रतिनिधी) : युगस्त्री. रणरागिणी ताराराणी यांच्या नावाचे महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ येत्या तीन-चार वर्षात स्थापन करण्याकरिता जाणीवेने प्रयत्न केले जातील, असे आश्वासन शिक्षणमहर्षि डॉ. डी. वाय. पाटील यांनी आज येथे बोलताना दिले.**

येथील डॉ. डी. वाय. पाटील कला क्रीडा, शैक्षणिक व सांस्कृतिक ट्रस्टने आयोजित केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, शिष्यवृत्ती वितरण आणि पारितोषिक वितरण समारंभात डॉ. डी. वाय. पाटील बोलत होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी न्यू एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष एम. बी. लोहिया होते.

ताराराणी महिला विद्यापीठाचा प्रस्ताव येत्या दोन-तीन महिन्यात शासनाकडे पाठविला जाईल. शासनाने त्यास परवानगी दिली तर ठीकच आहे, नाही तर शासकीय मदतीशिवाय हे विद्यापीठ सुरू करण्यासाठी प्रयत्न करूया, असेही डॉ. डी. वाय. पाटील म्हणाले.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. व्ही. टी. पाटील म्हणाले की, स्त्री-शिक्षणाविषयी आज बरीच उदासीनता आहे, स्त्रियांच्या शिक्षणाविषयी अनेक घोषणा केल्या जातात, पण कृती काहीच केली जात नाही. ही दुर्दैवाची बाब म्हणावी लागेल. शासनाच्या घोषणा या केवळ घोषणाच असतात.

ताराराणीला युगस्त्री मानायला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांइतकेच तिचेही कार्य मोठे आहे. अशा असामान्य ताराराणीचे स्मारक कोल्हापुरात व्हावे, ही माझी इच्छा आहे. शैक्षणिक क्षेत्रात अलौकिक कार्य करणाऱ्या डॉ. डी. वाय. पाटील यांनी पुढाकार घेऊन ताराराणींच्या नावाने स्वतंत्र महिला विद्यापीठ स्थापन

लोहिया म्हणाले की, एकीकडे शिक्षणाचा प्रभावी प्रसार होत असताना विद्यार्थ्यांमध्ये चिंताजनक बेशिस्त निर्माण होत आहे ही गंभीर बाब आहे. समाजसुधारक व शिक्षणतज्ज्ञांनी या गोष्टीचा गंभीरपणे विचार केला पाहिजे. कोल्हापुरात अलीकडेच घडलेल्या खुनाचा उल्लेख करून श्री. लोहिया म्हणाले की, हा खून केवळ एका व्यक्तीचा नसून समाजाचा आहे.

प्रारंभी दीप प्रज्वलन आणि स्वागत गीताने समारंभास सुरवात झाली. ट्रस्टचे अध्यक्ष संजय डी. पाटील यांनी प्रास्ताविकात ट्रस्टच्या कार्याची माहिती करून दिली. डी. एम. शेटके यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर १० वी व १२ वी परीक्षेत गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार, पारितोषिके व हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या हस्ते देण्यात आली. महेश देशपांडे या अपंग विद्यार्थ्याला शैक्षणिक मदत म्हणून अडीच हजार रुपयांचा धनादेश पत्रकार शिवाजी पाटील यांच्या हस्ते ट्रस्टतर्फे देण्यात आला. शेवटी एस. जी. तोडकर यांनी आभार मानले.

## पन्हाळा नगराध्यक्षांवरील अविश्वास ठराव बारगळला

पन्हाळा, दि. ३ (वार्ताहर) : काही विरोधी सदस्यांनी नगराध्यक्ष प्रभाकर भोसले यांच्याविरुद्ध मांडलेला अविश्वासाचा ठराव आज कोणीही विरोधक उपस्थित न राहिल्याने बारगळला.

काही दिवसांपूर्वी विरोधकांनी प्रभाकर भोसले यांच्याविरोधी अविश्वासाचा ठराव जिल्हाधिकाऱ्यांकडे दाखल केला होता. आपण हा अविश्वास ठराव जिंकू, असा विश्वासही या सदस्यांनी त्यावेळी व्यक्त केला होता.

या ठरावावर मतदान घेण्यासाठी आज सभा बोलाविण्यात आली होती. शाहूवाडीचे उपविभागीय अधिकारी